मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# महापालिकेत आता 'शून्य कचरा' क्रांती!

## झोपडपट्टी पुनर्वसन विभागाचा आदर्श; सर्व कार्यालयांत उपक्रम राबविण्याचा निर्धार!

» पिंपरी | प्रतिनिधी

**महापालिकेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाने 'शून्य कचरा कार्यालय' या उपक्रमाची सुरुवात करून इतर कार्यालयांसमोर आदर्श निर्माण केला आहे. पिंपरी चिंचवडसारख्या झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरात कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे हे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक कार्यालयाने स्वतःच्या स्तरावर अशा पद्धतीने पुढाकार घेऊन कचऱ्याचे वर्गीकरण आणि योग्य विल्हेवाट लावण्यास सुरुवात केल्यास या आव्हानावर मात करण्यास मदत होईल, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी व्यक्त केले.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त चिंचवड येथील झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाच्या मुख्य कार्यालयात 'शून्य कचरा कार्यालय' या उपक्रमाचा शुभारंभ अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि विक्रांत बगाडे यांच्या हस्ते करण्यात आला. शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासह कार्यालयीन स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण, योग्य विल्हेवाट आणि पर्यावरणपूरक सवयी रुजविण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्तांनी चिंचवड येथील कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पालाही भेट देऊन तेथील प्रशिक्षण उपक्रमांची पाहणी केली.

यावेळी उप आयुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त दशरथ कांबळे, कार्यकारी अभियंता शेखर गुरव, आसरा फाऊंडेशन अध्यक्षा अर्चना मोरे, कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्प व्यवस्थापक अमृता बहुलेकर, आयपीसीए प्रतिनिधी दत्ता हेंद्रे, वैभव नसुरडे, आशिष कुंभलकर तसेच महापालिका कर्मचारी आणि लाईटहाऊस प्रकल्पातील प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी शून्य कचरा कार्यालय उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना महापालिकेच्या इतर कार्यालयांमध्येही ही संकल्पना राबविण्याची गरज व्यक्त केली. तसेच कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पाच्या माध्यमातून युवकांना रोजगारक्षम बनविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा आढावा घेत, रोजगाराच्या बदलत्या संधींनुसार प्रशिक्षण अधिक परिणामकारक करण्याबाबत सूचना केल्या.

शून्य कचरा कार्यालयातून पर्यावरणपूरक सवयींना प्रोत्साहन – अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले, झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाचे उप आयुक्त अण्णा बोदडे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेला 'शून्य कचरा कार्यालय' हा उपक्रम कौतुकास्पद आहे. पिंपरी चिंचवडसारख्या झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरात कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे हे मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक कार्यालयाने स्वतःच्या स्तरावर पुढाकार घेऊन कचऱ्याचे वर्गीकरण आणि योग्य विल्हेवाट लावण्यास सुरुवात केल्यास या आव्हानावर मात करण्यास मदत होईल. या उपक्रमाचा आदर्श घेऊन महापालिकेच्या इतर कार्यालयांमध्येही अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पाविषयी बोलताना अतिरिक्त आयुक्त जंगम म्हणाले, युवकांना रोजगारक्षम बनविण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरत आहे. सध्या पिंपरी चिंचवड शहरात दहा वेगवेगळ्या ठिकाणी लाईटहाऊस प्रकल्प कार्यान्वित असून, युवकांना त्यांच्या आवडीनुसार विविध अभ्यासक्रमांचे मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. या प्रशिक्षणाचा लाभ घेणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक असणे ही विशेष कौतुकाची बाब आहे. बदलत्या काळानुसार रोजगाराच्या संधींमध्येही बदल होत आहेत. त्यामुळे पारंपरिक अभ्यासक्रमांपुरते मर्यादित न राहता ग्राफिक डिझायनिंग, डिजिटल मार्केटिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, व्हिडिओ एडिटिंग आणि मोशन ग्राफिक्स यांसारख्या आधुनिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जात आहे, ही सकारात्मक बाब आहे. यासोबतच युवकांना विविध परदेशी भाषांचे ज्ञान देणेही गरजेचे आहे. परदेशातील रोजगाराच्या संधींचा अभ्यास करून त्यानुसार प्रशिक्षण उपलब्ध करून दिल्यास युवकांना जागतिक स्तरावर करिअरच्या अधिक संधी मिळू शकतील, असेही त्यांनी नमूद केले.

अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे म्हणाले, झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाने महापालिकेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून 'शून्य कचरा कार्यालय' उपक्रम सुरू केला, ही अभिनंदनीय बाब आहे. मोठी लोकसंख्या असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात कचरा व्यवस्थापनाची समस्या सोडविण्यासाठी अशा संकल्पना उपयुक्त ठरू शकतात. भविष्यात महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये ही संकल्पना राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. त्याची सुरुवात मुख्य प्रशासकीय इमारतीपासून करण्यात येईल. अशा उपक्रमांमुळे कचरा विलगीकरण, पुनर्वापर आणि टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याबाबत जनजागृती होण्यास मदत होईल.भविष्यात महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये ही संकल्पना राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. त्याची सुरुवात मुख्य प्रशासकीय इमारतीपासून करण्यात येईल. कार्यालयीन स्तरावर कचऱ्याचे योग्य विलगीकरण, पुनर्वापर आणि टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याच्या उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास कर्मचाऱ्यांसह नागरिकांमध्येही कचरा व्यवस्थापनाविषयी जागरूकता वाढेल, असे त्यांनी सांगितले.

कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पाच्या माध्यमातून आतापर्यंत अनेक युवकांना विविध अभ्यासक्रमांचे मोफत प्रशिक्षण मिळाले असून, अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

## 'शून्य कचरा कार्यालय' म्हणजे काय?

कार्यालयात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, पुनर्वापर आणि पुनर्प्रक्रिया करून अंतिम विल्हेवाटीसाठी पाठवल्या जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमीत कमी ठेवणे, हा 'शून्य कचरा कार्यालय' या संकल्पनेचा मुख्य उद्देश आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाच्या मुख्य कार्यालयात या उपक्रमांतर्गत कचरा वर्गीकरणासाठी स्वतंत्र डब्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये काच संकलन, रद्दी पेपर संकलन, धातू संकलन, स्वच्छ पॉलिथिन संकलन, स्वच्छ प्लास्टिक संकलन आणि ई-कचरा संकलनासाठी स्वतंत्र डबे ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना संबंधित कचरा योग्य त्या डब्यात टाकणे शक्य होणार आहे. यासोबतच, ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून सेंद्रिय खतनिर्मिती करण्यासाठी ऑरगॅनिक कंपोस्ट ड्रमची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे कार्यालयात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, पुनर्वापरयोग्य वस्तूंचे स्वतंत्र संकलन आणि जैवविघटनशील कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यास मदत होणार आहे. तसेच, कर्मचाऱ्यांमध्ये कचरा विलगीकरणाच्या सवयी रुजवून पर्यावरणपूरक कार्यालयीन कार्यपद्धती विकसित करणे आणि स्वच्छ, सुंदर व हरित पिंपरी चिंचवडच्या उद्दिष्टाला चालना देणे हा या उपक्रमाचा हेतू आहे.

> "पिंपरी चिंचवड शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे ही प्रशासनासह प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. उप आयुक्त अण्णा बोदडे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या 'शून्य कचरा कार्यालय' उपक्रमाच्या माध्यमातून कार्यालयीन स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण, योग्य विल्हेवाट आणि ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खतनिर्मितीला प्रोत्साहन मिळेल. या उपक्रमाचा विस्तार महापालिकेच्या इतर कार्यालयांमध्येही करून स्वच्छ, सुंदर आणि हरित पिंपरी-चिंचवडच्या दिशेने ठोस पावले उचलण्यात येतील. तसेच, कौशल्यम लाईटहाऊससारख्या उपक्रमांच्या माध्यमातून युवकांना बदलत्या रोजगाराच्या संधींनुसार कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्यावरही महापालिकेचा भर राहील."
>
> -डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

# अप्पूघरात 49 झाडांवर कुऱ्हाड; ठेकेदाराला कोणाचे अभय?

## १३ झाडांच्या छाटणीची परवानगी, ४९ झाडांची कत्तल केल्याचा 'आप'चा आरोप

**पिंपरी | प्रतिनिधी**

**निगडीतील प्रसिद्ध अप्पूघर परिसरात तब्बल ४९ झाडांची विनापरवाना कत्तल करण्यात आल्याचा गंभीर आरोप आम आदमी पार्टीने केला आहे. केवळ १३ झाडांच्या छाटणीची परवानगी असताना तब्बल ४९ झाडांवर कुऱ्हाड कशी चालली? महापालिकेच्या मालकीच्या जागेवरच वृक्षांची कत्तल होत असताना उद्यान व वृक्ष संवर्धन विभाग नेमका काय करत होता? असा सवाल उपस्थित करत संबंधित ठेकेदारावर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याचा करार रद्द करण्याची मागणी 'आप'ने केली आहे. या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.**




यासंदर्भात आम आदमी पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष वैजनाथ शिरसाट यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांना निवेदन दिले. अप्पूघर चालविणाऱ्या खासगी ठेकेदाराने महापालिकेच्या उद्यान व वृक्ष संवर्धन विभागाकडून केवळ १३ झाडांच्या छाटणीची परवानगी घेतली होती.

मात्र, प्रत्यक्षात ४९ झाडांची खोडापासून कत्तल करण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. हा प्रकार महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, १९७५ मधील तरतुदींचे उल्लंघन करणारा असल्याचा दावा पक्षाने केला आहे. एकीकडे महापालिका पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड आणि हरित शहराच्या घोषणा करत असताना दुसरीकडे महापालिकेच्याच मालकीच्या जागेवरील वृक्षसंपदा धोक्यात येत असल्याचा आरोप 'आप'ने केला आहे.

संबंधित ठेकेदाराच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांनी या प्रकाराकडे दुर्लक्ष केले का? ठेकेदाराला कोणाचे अभय मिळत आहे? याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित ठेकेदारावर लागू कायद्यांनुसार गुन्हा दाखल करून त्याचा करार तात्काळ रद्द करावा. तसेच या प्रकरणात निष्काळजीपणा करणाऱ्या किंवा ठेकेदाराला संरक्षण दिल्याचे आढळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी पक्षाने केली आहे.

कत्तल करण्यात आलेल्या ४९ झाडांच्या बदल्यात तिप्पट म्हणजेच १४७ देशी प्रजातींची झाडे लावून त्यांच्या संगोपनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित ठेकेदारावर सोपवावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या गंभीर प्रकरणाची चौकशी करून सात दिवसांच्या आत ठोस कारवाई न झाल्यास पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मुख्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आम आदमी पार्टीने दिला आहे.

यावेळी आप रिक्षा संघटनेचे अध्यक्ष अंगद मुगळे, आप नेत्या कविता कोंडे देशमुख यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, आरोपांबाबत महापालिका प्रशासनाची अधिकृत भूमिका समोर आलेली नसून, चौकशीनंतर या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

### वृक्षसंवर्धनाच्या घोषणांना अप्पूघरात हरताळ?

शहरात वृक्षलागवड आणि पर्यावरण संवर्धनासाठी महापालिका विविध उपक्रम राबवत असताना अप्पूघरातील कथित वृक्षतोडीमुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. छाटणीची परवानगी दिलेल्या झाडांची संख्या आणि प्रत्यक्ष कत्तल झाल्याचा आरोप असलेल्या झाडांची संख्या यामध्ये मोठी तफावत आहे. त्यामुळे संबंधित परवानग्या, ठेकेदाराच्या कामकाजाची तपासणी आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे. आता महापालिका प्रशासन दोषींवर कारवाई करणार की हे प्रकरणही चौकशीच्या फेऱ्यात अडकणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# मोशीत तरुणीचा निर्घृण खून; मृतदेह आढळल्याने खळबळ!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**मोशी परिसरात एका अनोळखी तरुणीचा खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मंत्रा मोमेंट हाउसिंग कमर्शियल ऑफिसमधील गाळा क्रमांक ७ जवळ अंदाजे २५ ते ३० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. अज्ञात व्यक्तीने हत्याराने वार करून महिलेची हत्या केल्याचा प्राथमिक संशय असून, या प्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



ही घटना सोमवारी (दि. १२ ऑक्टोबर) मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमारास निदर्शनास आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आपत्कालीन डायल ११२ क्रमांकावर घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. तेथे एका अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आला. मृत महिलेचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून, तिने भगव्या रंगाचा टी-शर्ट, त्यावर निळसर जॅकेट आणि काळसर व हिरव्या पट्ट्यांची ट्रॅक पँट परिधान केली होती.

अज्ञात आरोपीने कोणत्यातरी कारणावरून महिलेवर हत्याराने वार करून तिला गंभीर जखमी केले आणि तिचा खून केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. हत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तसेच मृत महिलेची ओळखही पटलेली नसल्याने पोलिसांसमोर दुहेरी आव्हान उभे राहिले आहे.

या प्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भोजराज मिसाळ करीत आहेत. मृत महिलेची ओळख पटविणे, आरोपीचा शोध घेणे आणि हत्येमागील कारण स्पष्ट करणे या दिशेने पोलिसांचा तपास सुरू आहे. मोशीतील गजबजलेल्या परिसरात तरुणीचा मृतदेह आढळल्याने हत्येचे गूढ निर्माण झाले आहे. मृत महिलेची ओळख अद्याप पटलेली नसून, तिची हत्या नेमकी कोणत्या कारणातून आणि कोणी केली, हे तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी भोसरी एमआयडीसी पोलिस तपास करीत आहेत.

### मध्यरात्रीचा खून; तरुणीच्या मृत्यूचे गूढ कायम!

मोशीतील मंत्रा मोमेंट परिसरात मध्यरात्री अनोळखी तरुणीचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. मृत महिलेचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे असून, तिची ओळख अद्याप पटलेली नाही. महिलेचा खून नेमका कोणी आणि कोणत्या कारणातून केला? आरोपी आणि मृत महिलेचा काही संबंध होता का? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. अज्ञात आरोपीविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस उपनिरीक्षक भोजराज मिसाळ पुढील तपास करीत आहेत.

# दांडियाच्या दणदणाटाला पोलिसांचा दणका!

## ६२८ मंडळांवर पोलिसांचा वॉच; आवाजाची मर्यादा ओलांडल्यास थेट कारवाई

**»» पिंपरी | प्रतिनिधी**

**गणेशोत्सवात डीजेच्या दणदणाटाला लगाम घातल्यानंतर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी आता नवरात्रोत्सवातील दांडिया आणि गरबा कार्यक्रमांवरही करडी नजर ठेवली आहे. ध्वनिमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर कारवाई करण्यासह प्रखर बीमलाइट आणि लेझर लाइटच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. शहरातील ६२८ सार्वजनिक मंडळांवर 'एक मंडळ, एक पोलिस अंमलदार' योजनेतून लक्ष ठेवले जाणार असून, नियम मोडणाऱ्यांची गय केली जाणार नसल्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.**



पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत ६२८ सार्वजनिक मंडळांकडून नवरात्रोत्सव साजरा केला जात असून, भाविकांची गर्दी होणारी ४८ प्रमुख देवी मंदिरे आहेत. उत्सव काळात ११ आणि २० ऑक्टोबर या दोन दिवसांसाठी रात्री बारापर्यंत ध्वनिक्षेपक वापरण्यास सवलत देण्यात आली आहे. मात्र, इतर दिवशी रात्री दहा वाजताच ध्वनिक्षेपक बंद करावे लागणार आहेत. सवलतीच्या दिवशीही निर्धारित ध्वनिमर्यादेचे पालन बंधनकारक राहणार आहे.

प्रत्येक सार्वजनिक मंडळासाठी स्वतंत्र पोलिस अंमलदार नियुक्त करण्यात येणार असून, संबंधित मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कार्यक्रमांची माहिती पोलिसांकडे राहणार आहे. प्रखर लेझर आणि बीमलाइटच्या वापरामुळे नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी पोलिस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

गणेशोत्सवात डीजे यंत्रणा जप्त करून नियमभंग करणाऱ्या मंडळांवर गुन्हे दाखल करण्याची कठोर भूमिका पोलिसांनी घेतली होती. त्यामुळे विसर्जन मिरवणुकांमध्ये डीजेऐवजी पारंपरिक ढोल-ताशांचा गजर ऐकू आला. आता नवरात्रोत्सवातही पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याने मंडळांना नियमांचे काटेकोर पालन करावे लागणार आहे. दरम्यान, नवरात्रोत्सवात ४० ठिकाणी पथसंचलन, ५८ ठिकाणी दुर्गा दौड आणि २६ ठिकाणी रावणदहनाचे कार्यक्रम नियोजित आहेत. घटस्थापनेला ८४, तर विजयादशमीला तब्बल २३१ ठिकाणी मिरवणुका निघणार आहेत. कोजागिरी पौर्णिमेला १०५ ठिकाणी मिरवणुकांचे आयोजन असून, ४७१ मंडळे जागेवरच देवीमूर्तींचे विसर्जन करणार आहेत. या पार्श्वभूमीवर गर्दी, वाहतूक कोंडी आणि बेशिस्त पार्किंग रोखण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. दांडिया कार्यक्रमांमध्ये महिला आणि तरुणींच्या सुरक्षेलाही प्राधान्य देण्यात येणार आहे. गर्दीचा गैरफायदा घेऊन छेडछाड, चोरी किंवा हुल्लडबाजीचे प्रकार घडू नयेत, यासाठी साध्या वेशातील पोलिसांसह महिला पोलिसांची गस्त राहणार आहे. कार्यक्रमस्थळी वाहनतळ, प्रवेश आणि बाहेर पडण्याचे स्वतंत्र मार्ग तसेच स्वयंसेवकांची व्यवस्था करण्याच्या सूचना आयोजकांना देण्यात आल्या आहेत.

नवरात्रोत्सवात दांडिया आणि गरब्याच्या नावाखाली ध्वनिप्रदूषण करणाऱ्या मंडळांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. रात्री दहानंतर ध्वनिक्षेपक बंद करण्याचे बंधन असून, केवळ दोन दिवस मध्यरात्री बारापर्यंत सवलत असेल. मात्र, या सवलतीचा अर्थ अमर्याद आवाजाला परवानगी असा नाही. प्रAखर लेझर लाइट, बीमलाइट आणि ध्वनिमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे यंदा दांडियाचा जल्लोष करताना मंडळांना पोलिसांच्या नियमांचीही काटेकोर अंमलबजावणी करावी लागणार आहे.

# अडीच वर्षे उलटली, विकास रखडला; प्रवाशांच्या नशिबी गैरसोय!

**»» पिंपरी | प्रतिनिधी**

**अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत आकुर्डी, चिंचवड आणि तळेगाव रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकासाचा गाजावाजा करण्यात आला. मात्र, अडीच वर्षांचा कालावधी उलटूनही अनेक कामे अपूर्णच असल्याने रेल्वे प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होत असताना प्रवाशांना अद्याप लिफ्ट, सरकते जिने, प्रतीक्षागृहे आणि स्वच्छतागृहांसारख्या मूलभूत सुविधांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे रेल्वेस्थानकांचा विकास नेमका कधी पूर्ण होणार, असा संतप्त सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे.**



पुणे-लोणावळा मार्गावरील आकुर्डी, चिंचवड आणि तळेगाव ही महत्त्वाची रेल्वेस्थानके आहेत. या मार्गावर दररोज ४२ लोकल गाड्यांची ये-जा होते. प्रवाशांना आधुनिक सुविधा देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशातील ५५४ रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकास कामांचा ऑनलाइन शुभारंभ करण्यात आला होता.

पहिल्या टप्प्यात पुणे विभागातील आकुर्डी, चिंचवड आणि तळेगावसह १६ स्थानकांचा समावेश करण्यात आला. चिंचवड रेल्वेस्थानकासाठी सुमारे २० कोटी, तर आकुर्डीसाठी ३३ कोटी ८ लाख रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे. मात्र, कामांची संथ गती पाहता प्रवाशांच्या सुविधांपेक्षा कामांचा विलंबच अधिक चर्चेत आला आहे.

या योजनेतून प्रशस्त प्रतीक्षागृहे, सुधारित फलाट, पादचारी पूल, लिफ्ट, सरकते जिने, स्वच्छतागृहे, दिव्यांगांसाठी सुविधा आणि आधुनिक प्रकाशयोजना उभारण्यात येत आहे. मात्र, चिंचवड स्थानकावर सरकता जिना आणि फलाट क्रमांक दोन व तीनदरम्यान उद्वाहक बसविण्यात आले असले, तरी ते अद्याप प्रवाशांसाठी खुले करण्यात आलेले नाहीत. फलाट क्रमांक एक आणि तीनवरील स्वच्छतागृहांची कामे पूर्ण झाली असली, तरी दरवाजे व्यवस्थित बंद होत नसल्याच्या आणि बेसिन लहान असल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून केल्या जात आहेत.

आकुर्डी रेल्वेस्थानकावरही परिस्थिती वेगळी नाही. फलाट क्रमांक एक आणि दोनला जोडणाऱ्या पादचारी पुलाचे काम अपूर्ण असून, जलशुद्धीकरण यंत्र बसवूनही ते बंद अवस्थेत आहे. विद्युत उपकरणांची कामेही रखडली आहेत. त्यामुळे सुविधा उभारूनही त्या वापरता येत नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

रेल्वे प्रशासनाच्या माहितीनुसार, फलाटांच्या पृष्ठभागाचे सुमारे ९० टक्के, छताचे ९५ टक्के, तर रॅम्पसह पादचारी पुलाचे ७२ टक्के काम पूर्ण झाले आहे. विविध लिफ्टची कामे ५५ ते ८५ टक्क्यांदरम्यान असून, एका सरकत्या जिन्याचे काम ६० टक्के पूर्ण झाले आहे. तिकीट कार्यालय, आरपीएफ ठाणे आणि इतर सुविधांची कामेही अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात येत आहे. उर्वरित कामे दोन महिन्यांत पूर्ण करण्याचा दावा रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येत असला, तरी प्रत्यक्षात प्रवाशांना सुविधा कधी उपलब्ध होणार, याबाबत प्रश्न कायम आहे.

# सव्वादोन कोटींच्या सोन्यावर काका-पुतण्याचा डल्ला!

## रविवार पेठेत घरफोडी करून २ किलो २०० ग्रॅम सोने लंपास; चोरट्यांचा पर्दाफाश

» पुणे | प्रतिनिधी

**सराफ व्यावसायिकांसाठी दागिने घडविणाऱ्या कारागिराच्या घरावर डल्ला मारून तब्बल सव्वादोन कोटींचे सोने चोरणाऱ्या काका-पुतण्याला खडक पोलिसांनी अवघ्या १२ तासांत बेड्या ठोकल्या. रविवार पेठेतील सदनिकेचे कुलूप तोडून तब्बल दोन किलो २०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि बिस्किटे लंपास करण्यात आली होती. मात्र, सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्याचा छडा लावत आरोपींकडून एकूण दोन कोटी २४ लाख ८६२ रुपये किमतीचे सोने जप्त केले.**



मुस्तफा नजीर शेख (वय ३६) आणि त्याचा पुतण्या सरफराज ऊर्फ आवेज मैनुद्दीन शेख (वय २२, दोघे रा. रविवार पेठ) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी सोन्याचे दागिने घडविणाऱ्या कारागिराने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

फिर्यादी कारागीर रविवार पेठेतील जुनी गुजरी परिसरातील एका सोसायटीत पत्नीसह राहतात. सराफ बाजारातील व्यावसायिक त्यांच्याकडे दागिने घडविण्यासाठी सोने देतात. १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास कारागीर आणि त्यांची पत्नी कामानिमित्त घराबाहेर पडले होते. हीच संधी साधत चोरट्यांनी सदनिकेचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. कपाटातील दोन किलो २०० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि सोन्याची बिस्किटे घेऊन चोरटे पसार झाले. रात्री साडेआठच्या सुमारास घरफोडीचा प्रकार उघडकीस आला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले यांनी घटनास्थळी भेट दिली. खडक पोलिसांनी सोसायटीतील सीसीटीव्ही चित्रीकरणाची तपासणी केली असता दोन संशयित आढळले. तपासात संशयित त्याच सोसायटीत राहत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी मुस्तफा आणि सरफराज यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान दोघांनी चोरीची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली.

आरोपींकडून चोरीला गेलेल्या सोन्यासह अतिरिक्त ४६ ग्रॅम सोनेही हस्तगत करण्यात आले. जप्त सोन्याची एकूण किंमत दोन कोटी २४ लाख ८६२ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

सव्वादोन कोटींच्या घरफोडीप्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे चोरी करणारे काका-पुतणे त्याच सोसायटीतील रहिवासी असल्याचे पोलीस तपासात समोर आले. कारागीर दाम्पत्य घराबाहेर पडताच सदनिकेचे कुलूप तोडून सोन्यावर डल्ला मारण्यात आला. मात्र, सोसायटीतील सीसीटीव्ही चित्रीकरणामुळे आरोपींचा माग काढण्यात पोलिसांना यश आले. अवघ्या १२ तासांत आरोपींना अटक करून कोट्यवधींचे सोने हस्तगत केल्याने खडक पोलिसांच्या जलद तपासाची चर्चा सुरू झाली आहे.

# हिंजवडी मेट्रोचा वनवास संपणार; ३ नोव्हेंबरला हिरवा कंदील?

» पुणे | प्रतिनिधी

**वर्षानुवर्षांची प्रतीक्षा, रखडलेली कामे आणि निवडणूक आचारसंहितेच्या अडथळ्यानंतर अखेर माण-हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोच्या उद्घाटनाचा मुहूर्त जवळ आला आहे. येत्या ३ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या महत्त्वाकांक्षी मेट्रो सेवेला हिरवा कंदील दाखविला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुणेकरांसह हिंजवडी आयटी पार्कमधील हजारो कर्मचाऱ्यांना वाहतूक कोंडीतून मोठा दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.**



पुण्याच्या आयटी हबला शहराच्या मध्यवर्ती भागाशी जोडणाऱ्या या मेट्रो मार्गाच्या उद्घाटनाची तयारी पीएमआरडीएकडून करण्यात येत आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी २३ जुलै रोजी माण ते आर. के. लक्ष्मण संग्रहालय या १२ स्थानकांदरम्यान प्रवासी सेवा सुरू करण्यास मंजुरी दिली होती. त्यानंतर आणखी पाच स्थानकांची सुरक्षा तपासणी पूर्ण होऊन मंजुरी मिळाल्याने आता १७ स्थानकांवर मेट्रो सेवा सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या मेट्रोच्या उद्घाटनासाठी पीएमआरडीएने राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठविला होता. मात्र, पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीमुळे लागू झालेल्या आचारसंहितेचा फटका उद्घाटनाला बसला. ही आचारसंहिता २७ ऑक्टोबरपर्यंत असल्याने उद्घाटन पुढे ढकलावे लागले. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रस्तावित ३ नोव्हेंबरच्या बारामती दौऱ्यादरम्यान मेट्रोचे उद्घाटन करण्याचे नियोजन असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

माण ते जिल्हा न्यायालय या मार्गावरील १७ स्थानकांवर पहिल्या टप्प्यात प्रवासी सेवा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. यामध्ये हिंजवडीतील प्रमुख आयटी केंद्रे, वाकड, बालेवाडी, औंध, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि जिल्हा न्यायालय परिसराचा समावेश आहे. उर्वरित सहा स्थानकांची कामे डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, पुढील वर्षी सर्व २३ स्थानकांवर सेवा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

दरम्यान, मेट्रो प्रकल्पाला मार्च २०२७ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. एकूण २३.३ किलोमीटर लांबीच्या या मार्गामुळे हिंजवडी ते पुणे शहरादरम्यानचा प्रवास अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे. मात्र, ३ नोव्हेंबरच्या उद्घाटन कार्यक्रमाची अंतिम अधिकृत घोषणा अद्याप बाकी आहे.

माण-हिंजवडी ते शिवाजीनगर या २३.२ किलोमीटरच्या मेट्रो मार्गावर एकूण २३ स्थानके आहेत. त्यापैकी १७ स्थानकांना सुरक्षा मंजुरी मिळाली असून, उर्वरित सहा स्थानकांची कामे डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ३ नोव्हेंबर रोजी उद्घाटन होण्याची शक्यता असली, तरी अधिकृत घोषणेची प्रतीक्षा आहे.